**प्रेस नोट**

जागतिक पोलीस ॲन्ड फायर गेम्स, चेंगडु चीन या ठिकाणी दिनांक ०८/०८/२०१९ ते १८/०८/२०१९ दरम्यान पार पडलेल्या स्पर्धेमध्ये जगभरातील ७० देशांचे स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये भारतीय पोलीस संघातून गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे कडील महिला पोलीस हवालदार मनिषा शिवाजी थिटे यांनी ४०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये कास्य पदक प्राप्त करून महाराष्ट्र पोलीस दलाचे लौकीकात भर घातली आहे.

यापुर्वी सन २०१८ मध्ये मलेशिया येथे पार पडलेल्या ३२ व्या मलेशिया इंटरनॅशनल ओपन मास्टर चॅम्पीयनशिप स्पर्धेमध्ये श्रीमती थिटे यांना ४X४०० मिटर रिले शर्यतीमध्ये ब्राँझ पदक मिळाले होते.

सदर कामगिरीबाबत मा.श्री.अतुलचंद्र कुलकर्णी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे मा. श्री. प्रविण साळुंके विशेष पोलीस महानिरीक्षक, गु.अ.वि.म.रा.पुणे मा.श्री. फत्तेसिंह पाटील विशेष पोलीस महानिरीक्षक,गु.अ.वि.म.रा.पुणे, मा.श्री.दत्तात्रय मंडलिक, विशेष पोलीस महानिरीक्षक, गु.अ.वि.म.रा.पुणे, मा.श्री.जालिंदर सुपेकर पोलीस उपमहानिरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, गु.अ.वि.म.रा.पुणे, वैशाली माने अपर पोलीस अधीक्षक, भरारी पथक, गु.अ.वि.म.रा.पुणे या सर्वांनी महिला पोलीस हवालदार थिटे यांचे अभिनंदन केले.




Scanned by CamScanner